दाखल दिनांक –१६.०३.२०१५.
नोंदणी दिनांक –१६.०३.२०१५.
निकाल दिनांक– ०५.१२.२०१५.
कालावधी– ००व. ०८म. १९दि.

न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग, खडकी, पुणे यांचे कोर्टात.
( सतिश क. बांगड यांचेसमोर.)

रे.फौ.ख.नं. ९७/२०१५.

नि.

महाराष्ट्र शासन
( तर्फे दिघी पोलीस
स्टेशन, पुणे. ) .... अभियोगपक्ष

विरूध्द

प्रकाश भानुदास निकम
वय: २५वर्षे, धंदा: काहीच नाही
रा. कृष्णा चांदगुडे काळे कॉलनी, देहुफाटा,
काळे पेट्रोलपंपासमोर, आळंदी रोड, पुणे. ... आरोपी

---

अभियोगपक्षातर्फे सरकारी अभियोक्ता श्रीमती खडके.
आरोपी तर्फे अभियोक्ता श्री. नलावडे.

---

## न्यायनिर्णय.

(दि. ०५/१२/२०१५ रोजी अधोघोषित.)

दिघी पोलीस स्टेशन यांनी दाखल केलेल्या भारतीय दंड संहितेचे कलम ३८० प्रमाणेच्या दोषारोपाच्या अनुषंगाने आरोपी सदर खटल्यास सामोरे जात आहेत.

अभियोगपक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे—

२. दि. २७.११.२०१४ रोजी रात्री ०६.०० वा. चे सुमारास खबर देणार प्रतिक निशीनंदनप्रसाद आनंद हे शेजारच्या रुममध्ये मित्रासोबत गप्पा मारत होते. त्यावेळेस आरोपीने खबर देणार यांच्या रुमचे उघडया दरवाज्यातून प्रवेश करुन खबर देणार यांचा लॅपटॉप किंमत रु. २०,०००/— व खबर देणार यांच्या मित्राचा मोबाईल किंमत रु. ९,०००/— चोरले. परंतु खबर देणार यांना गावी जायचे असल्याने त्यांनी त्या दिवशी तक्रार न करता घटनेच्या एक महिन्यानंतर खबर देणार यांनी पोलीस ठाण्यात जावून तक्रार दिली.

३. सदर खबरवरून दिघी पोलीस स्टेशन येथे गु.र.नं. ३२/२०१५ उपरोक्त कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला. सदर गुन्हयाचा तपास पोलीस उपनिरीक्षक एस. एन. आहेर यांनी केला. त्यानंतर त्यांनी घटनास्थळावर जावून घटनास्थळाचा पंचनामा केला, तपासा दरम्यान आरोपींना अटक केली व तपास पुर्ण झाल्यानंतर आरोपींविरूध्द दोषारोपपत्र दाखल केले.

४. आरोपी याचेविरूध्द भारतीय दंड विधान कलम ३८० प्रमाणे नि. १३ नुसार दोषारोप निश्चित करण्यात आले. ते त्यास त्यांचे मातृभाषेत वाचून व समजावून सांगितले असता त्याने गुन्हा कबूल नसल्याचे सांगून संपरीक्षा करण्याची मागणी केली.

५. आरोपीविरूध्द पुरावे आढळून आल्याने त्याचे फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये जबाब नोंदविण्यात आले

आहेत.

६. माझेसमोर उपस्थित झालेले मुददे, त्यावरील निष्कर्ष व त्या निष्कर्षाला येण्याची कारणे खालीलप्रमाणे आहेत.

| | मुददे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १ | अभियोगपक्षाने असे सिध्द केले आहे काय की आरोपीने खबर देणार याचा किंमत रु. २०,०००/— चा लॅपटॉप व खबर देणार याच्या मित्राचा किंमत रु. ९०००/— चा मोबाईल चोरी केला? | ... | नकारार्थी. |
| २ | काय आदेश? | ... | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा.

मुददे क्र. १ व २ करीताः—

७. आरोपीविरूध्दचे आरोप सिध्द करण्यासाठी अभियोगपक्षाने या कामी दोन साक्षीदार तपासले. साक्षीदार क्र. १ शरद आहेर हे तपासी अंमलदार असून त्यांना नि. १६ वर तपासले. त्यांनी कथन केले आहे की, त्यांना गु.र.नं. ३२/२०१५ चा तपास मिळाला, आरोपीस अटक केली, साक्षीदारांचे टिपण नोंदवले, घटनास्थळ पंचनामा केला, आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर केले. साक्षीदार क्र. २ संतोष काटे हे पोलीस निरीक्षक असून त्यांना नि. १९ वर तपासले आहे. त्यांनी कथन केले आहे की, त्यांनी आरोपीला अटक केली, आरोपीने पंचासमक्ष निवेदन दिले, आरोपीने ज्या ठिकाणी चो—या केल्या तेथे पचंनामा केला

व आरोपीविरुध्द दोषारोपपत्र सादर केले.

८. अभियोगपक्षास वारंवार संधी देवूनही अभियोगपक्षाने या कामी खबर देणार, इतर साक्षीदार व पंचसाक्षीदार यांना तपासले नाही. तसेच खबर देणार याचा लॅपटॉप चोरी गेला या बाबतची तक्रार त्याने एक महिन्यानंतर दिली. तसेच खबर देणार याचा मित्राचा मोबाईल चोरी गेला होता. त्या बाबतची तक्रार खबर देणार याच्या मित्राने देणे आवश्यक होती. पण ती तक्रार खबर देणार याने दिली.

९. आरोपीने ज्या ठिकाणी चोरी केली ते मुलांचे वस्तीगृह असून तेथे अनेक मुले राहतात. परंतु तेथील एकही साक्षीदार या कामी तपासण्यात आला नाही. त्यामुळे तेथे चोरलेल्या वस्तु आरोपीनेच चोरल्या याबाबतचा कोणताही पुरावा या कामी दाखल करण्यात आला नाही. तसेच खबर देणार व त्याचा मित्र यांना या कामी तपासण्यात आले नाहीत. तसेच आरोपीच्या ताब्यातून जो मुददेमाल जप्त केला तो या कामी दाखल करण्यात आला नाही. जो मुद्देमाल जप्त केला तो खबर देणार याच्या मालकीचा होता या बद्दलचा कोणताही पुरावा या कामी दाखल करण्यात आला नाही. अभियोगपक्षास पुरेशी संधी देवूनही आरोपीविरुध्द काहीही पुरावे या कामी दाखल केले नाही. त्यामुळे आरोपी विरुध्दचे कोणतेही आरोप सिध्द झालेले नाहीत म्हणून मुददा क्र. १ चे उत्तर नकारार्थी देवून मुददा क्र. २ च्या उत्तरार्थ खालील आदेश पारीत करीत आहे.

## आदेश.

(१) आरोपी प्रकाश भानुदास निकम यांना फौ. प्र. संहितेचे २४८(१) अन्वये भारतीय दंड संहितेचे शिक्षेस पात्र असलेले कलम ३८० च्या आरोपातून दोषमुक्त करण्यात येते.

(२) त्याचे बंधपत्र व जामीन रद्द करण्यात येते.

( सतिश क. बांगड.)
न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग,
खडकी, पुणे.

खडकी.
दि. ०५/१२/२०१५.

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. file Judgment are same word for the word as per original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Steno | :- | D. N. Sonawane, Steno L.G. |
| Court Name | :- | S. K. Bangad.<br>Judicial Magistrate F.C.,<br>Khadki Pune. |
| Date of decision. | :- | 05.12.2015. |
| P. O. signed on | :- | 05.12.2015. |
| Date | :- | 15.12.2015. |